## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/१०/२०१७

**१) अज्ञात ट्रकच्या धडकेत दोन जखमी व एकाचा मृत्यु –**

दिनांक २७/१०/२०१७ चे २१.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी अरूणसिंह देविसिंह बघेल वय ४३ वर्ष रा. कावरा पेट उमरेड जि. नागपुर हा त्याचे परीवारासह भुयार गावी आल्यावर मित्राकडे जेवन करून भाटव्याकडे भुयार गावी फिर्यादीची पत्नी सौ. शारदा अरूनसिंह बघेल वय ३५ वर्ष रा. उमरेड ही गुलाब लक्ष्मण झाडे त्याची पत्नी सौ. लता झाडे असे लोक मोटार सायकलवर बसुन फिर्यादीचा भाटवा अण्णा भोयर यांचे कडे परतीला येत असतांनी यातील अज्ञात आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने लापरवाहीने चालवुन मोटार सायकलला धडक दिल्याने गुलाब व त्याची पत्नी सौ. शारदा हिचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देत पडुन गेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३०४ (अ),२७९,३३७ भादवी. सहकलम १८४ १३४,१८७ (अ)(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) गळफास लावुन इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक २८/१०/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील मृतक युवराज जगदीश गणवीर वय ४५ वर्ष रा. स्टेशन टोली तुमसर याने घराचे मागील सज्याचे लोंखडी हुकाला नॉयलॉन दोरी बांधुन गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी सिध्दार्थ नत्थु मेश्राम वय ५० वर्ष रा. स्टेशन टोली तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.हावरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**३) अंगावर विज पडुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०५/१०/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील मृतक नरसिंह शरद उपराडे वय ३६ वर्ष रा. देव्हाडा हा दि. ५/१०/२०१७ चे १५.३०. वाजता स्वत:चे शेतात काम करीत असतांना अचानक पाऊस सरू झाला व अचानक विज पडल्याने मृतकचे डोक्यावर, छातीवर ,पोटा व उजवे पायाचे चमडीवर विज पडुन जळाल्याने त्यास औषधोपचारा करीता सु.बो. दवाखना तुमसर येथे प्रथम उपचार करून पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे वार्ड क्र. २५४ मध्ये भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ.चे कागदपत्र टपाला द्वारे दि. २८/१०/२०१७ ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गोमासे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेश्न मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफो. केवट पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत.

**४) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोंकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २८/१०/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पीवळी वाहन ही सार्वजनीक आम रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल, अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. मडावी पो.स्टे. दिघोरी करीत आहेत.

**५) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:–**

**अ)** दिनांक २८/१०/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे दि. २८/१०/२०१७ ला पो. स्टे हद्दीत ड्रंक अॅन्ड ड्रायवर केसेस करणे कामी डयुटी लागली असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल मद्य प्राशन करून चालवीतांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी उबाळे पो.स्टे. तुमसर करीत आहद

**ब)** दिनांक २८/१०/२०१७ चे १९.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारू पीवुन दारूच्या नशेत चालवीतांनी मिळुन आल्याने ,त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी मेसरे पो.स्टे. तुमसर करीत आहेत.

**क)** दिनांक २८/१०/२०१७ चे १९.३० ते १९.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दारू पीवुन दारूच्या नशेत भरधाव वेगाने , वेडीवाकडी चालवीतांनी मिळुन आल्याने ,त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर करीत आहेत

**६) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २८/१०/२०१७ चे १९.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल मद्य प्राशन करून चालवीतांनी मिळुन आल्याने ,त्याचे ब्रिथ अल्कोहोल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. टेंभुर्णे पो.स्टे. कारधा करीत आहेत.

**७) अवैध दारू/जुगार अंडयावर धाडी . :–**

दिनांक २८/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा ,जवाहरनगर, व गोबरवाही, येथे अवैध दारू/जुगार अंडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ लिटर हातभट्टी दारू + नगदी ३,५३०/–रु.+ १ मोबाईल कि. १३,५३०/रु व ५४० मिली लिटर देशी दारू १५० /रु तसेच जुगारातुन कि. ९,९९५/रु असा एकुण २३,६७५/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :**

दिनांक २८/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०७ तीन सिटर वाहनांवरती १८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९५ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनी. माया चाटसे)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.